“अ” व “क” दर्जा प्राप्त ५ दर्जेदार मराठी चित्रपटांना निर्मितीसाठी प्रोत्साहनपर अर्थसहाय्य मंजूरीस वित्तीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: मचिअ-२०२६/प्र.क्र.५८/सां.का.१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १६ जुलै, २०२६.

वाचा:
१) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.३० ऑक्टोबर, २०१३
२) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक मचिअ-२०१२/प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.२८ ऑगस्ट, २०१४
३) शासन शुध्दीपत्रक,पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांक मचिअ-२०१२/ प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.०८ ऑगस्ट, २०१८
४) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. गोचिन-२०२२/ प्र.क्र.५८/सां.का.१, दि.२५ जानेवारी, २०२३
५) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. गोचिन-२०२२ / प्र.क्र.५८/सां.का.१, दि.०३ मार्च, २०२३
६) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०२४/प्र.क्र.८९/सां.का.१, दि.२५ सप्टेंबर, २०२४
७) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०२४/ प्र.क्र.८९/सां.का.१, दि.०७ ऑक्टोबर, २०२४
८) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०२४/ प्र.क्र.९१ (अ) /सां.का.१, दि. ०७ ऑक्टोबर, २०२४
९) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०२४/ प्र.क्र.९१ (अ) /सां.का.१, दि. २८ मार्च, २०२५
१०) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, गोरेगाव मुंबई यांचे दि.२६ मे, २०२६ चे पत्र.
११) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र.मचिअ-२०२६/ प्र.क्र.५८ /सां.का.१, दि.३० जुन, २०२६

प्रस्तावना:

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याकरीता अर्थसहाय्य करण्यासाठी उपर्निर्दिष्ट १ अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर चित्रपटांची पात्रता तपासण्यासाठी संदर्भ क्र. ४ व ५ येथील शासन निर्णयान्वये समिती

गठीत करण्यात आलेली आहे. सदर गठीत समितीमार्फत छाननीअंती पात्र ठरलेल्या ५ चित्रपटांना रु.१३५.०० लक्ष इतक्या रकमेस संदर्भ क्र. ११ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने रु.१३५.०० लक्ष (अक्षरी रुपये एक कोटी पस्तीस लक्ष फक्त) इतक्या खर्चास वित्तीय मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन योजनेअंतर्गत उपनिर्दिष्ट १ ते ३ व ६ मधील शासन निर्णयात नमूद तरतूदीनुसार गठीत समितीमार्फत छाननीअंती पात्र ठरलेल्या ५ चित्रपटांना रु.१३५.०० लक्ष निधीस या शासन निर्णयान्वये वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.झेडडी-२, २२०५-कला व संस्कृती कार्यक्रम, (००) १०२, कला संस्कृती प्रचालन, (०३)(०७) मराठी चित्रपट निर्मितीसाठी सहायक अनुदान (कार्यक्रम) (२२०५ १५९९) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) "या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान सशर्त आहे.

०३. सदर प्रकरणी मंजूर करण्यात आलेली रक्कम आहरित करुन संबंधितांना वितरीत करण्याकरिता अवर सचिव (रोखशाखा), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व उप सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाच्या रकमेची देयके आभासी वैयक्तिक ठेव लेखा (VPDA) द्वारे आहरित करण्यासाठी अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई येथे सादर करुन विहित प्रणालीद्वारे संबंधितांना वितरीत करावी. या प्रयोजनार्थ वितरीत निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र या विभागास सादर करणे बंधनकारक राहील. सदर कार्यवाहीबाबतचा अनुपालन अहवाल शासनास एक महिन्यात सादर करण्यात यावा.

०४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. /२०२६/व्यय-१५, दि. /०६/२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार तसेच, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९ एप्रिल, २०२६ अन्वये विहित अटी व शर्ती पूर्ततेच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०७१६१७४४४७११४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUMANT DINKAR PASHTE

Digitally signed by SUMANT DINKAR PASHTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS,
2.5.4.20=58694D4CD2BD16F0AB6514FC8598A9AA217E2508455856A701ADB1BB6EF9B120, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AFC006DAAE95D0F2CF7C7F09CA18CF0C9C9363A05E6070B1C03455CF1CB43586, cn=SUMANT DINKAR PASHTE
Date: 2026.07.16 17:45:50 +05'30'

(सुमंत दि. पाष्टे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरीक्षा)-एक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
८. नियोजन विभाग (का.१४४३), मंत्रालय, मुंबई
९. वित्त विभाग (व्यय-१५, अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई
१०. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- यांना विनंती करण्यात येते की, उक्त अनुदानाची रक्कम अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (BEAMS) उपलब्ध करुन देण्यासंदर्भातील कार्यवाही करण्यात यावी.
११. अवर सचिव (रोख शाखा), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयातील नमूद रक्कम व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव, मुंबई यांच्या नावे वितरीत करण्यात यावी.
१२. निवड नस्ती- सां.का.१.